शासकीय व अशासकीय समारंभाच्या
वेळी करावयाची बैठकीची व्यवस्था

माजी राज्यपाल व महाराष्ट्राचे माजी
मुख्यमंत्री यांचे स्थान

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. डब्ल्यूआरपी-१०९५-३९/३०
दि. १ मार्च, १९९६

राज्याच्या शासकीय व अशासकीय समारंभाच्या वेळी निमंत्रितांची बैठकीची व्यवस्था केंद्र शासनाने वेळोवेळी काढलेल्या शासकीय अधिकाऱ्यांच्या व अशासकीय व्यक्तींच्या अग्रक्रमसूचीप्रमाणे करण्यात येते. अशा अग्रक्रमसूचीमध्ये सर्वच अशासकीय व्यक्तींचा समावेश करता येणे कठीण असल्याने फक्त महत्वाच्या अशासकीय व्यक्तींच्या पदांचा अंतर्भाव असतो. अशा अग्रक्रमसूचीमध्ये माजी राज्यपाल व माजी मुख्यमंत्री या पदांचाही समावेश नाही. त्यामुळे कित्येक वेळा काही अशासकीय मान्यवरांना कोणती जागा द्यावी, असा प्रश्न उभा राहतो.

२. शासकीय व अशासकीय समारंभाच्या वेळी इतर राज्यांचे माजी राज्यपाल, ज्यांचे वास्तव्य साधारणत: महाराष्ट्रात असते, वा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यांना द्यावयाच्या स्थानाबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. राज्यपाल व मुख्यमंत्री अशी महत्वाची पदे भूषविलेल्या मान्यवरांना त्यांचा योग्य तो मान मिळावा, अशी सर्वसाधारण अपेक्षा आहे.

३. ही परिस्थिती लक्षात घेऊन शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, शासकीय वा अशासकीय समारंभाच्या वेळी इतर राज्यांचे माजी राज्यपाल व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री या मान्यवरांना, प्रमूख पाहुण्यांच्या कक्षात पहिल्या रांगेत उपमुख्यमंत्र्यांच्या नंतर परंतू मंत्रिमंडळातील इतर सदस्यांच्या वर स्थान देण्यात येते.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

गोविंद स्वरुप,
सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,
सा.प्र.वि., मंत्रालय

प्रत-
मा. राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,